थोडक्यात...

शिवसेनेच्या पाथरी शहरप्रमुखपदी माजी नगरसेवक आयुब उर्फ लालू खान यांची निवड

(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

पाथरी- शहरातील शिवसेना संघटनेला बळकटी देण्याच्या दृष्टीने माजी नगरसेवक आयुब उर्फ लालू खान यांची शिवसेनेच्या पाथरी शहरप्रमुखपदी एकमताने निवड करण्यात आली. गुरुवारी (ता.१२) शिवसेना नेते तथा जिल्हाप्रमुख सईद खान यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. निवडीनंतर सईद खान यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमात नवनियुक्त शहरप्रमुख लालू खान यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लालू खान यांना शुभेच्छा देत त्यांच्या नेतृत्वाखाली पाथरी शहरात शिवसेना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला. लालू खान यांनी यापूर्वी पंधरा वर्षे नगरसेवक म्हणून काम केले असून पक्ष संघटनात सक्रिय भूमिका आणि धडक कार्यशैलीमुळे त्यांची राजकीय क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे पाथरी शहरातील शिवसेना संघटनेला अधिक बळ मिळणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या कार्यक्रमास माजी शहरप्रमुख युसुफोद्दीन अन्सारी, नगराध्यक्ष आसेफ खान, माजी नगराध्यक्ष मुंजाजीराव भाले, अशोक गिराम, नाना टाकळकर, उपनगराध्यक्ष आलोक चौधरी, नगरसेवक गोविंद हरकळ, अनिल ढवळे, उद्धव नाईक, माजी नगरसेवक इरफान सेठ, मुख्तार अली, एल. आर. कदम, अनंत वाकणकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणासाठी पूर्वतयारी सुरु; मतदारांना आवश्यक माहिती देण्याचे आवाहन

परभणी - विधानसभा क्षेत्र क्र. ९६ अंतर्गत मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षणाच्या अनुषंगाने पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व मतदारांनी आवश्यक माहिती उपलब्ध करून देऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी (९६-परभणी विधानसभा मतदारसंघ) उदयसिंह भोसले यांनी केले.

ज्या मतदारांचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त आहे त्यांनी सन २००२ च्या मतदार यादीत आपले नाव शोधून संबंधित विधानसभा क्रमांक, भाग क्रमांक व अनुक्रमांक ही माहिती आपल्या परिसरातील बीएलओ (Booth Level Officer) यांच्याकडे जमा करावी. तसेच ज्या मतदारांचे वय १८ ते ४० वर्षे दरम्यान आहे तसेच विवाहित महिलांनी आपल्या आई-वडील किवा आजोबा-आजी यांची नावे सन २००२ च्या मतदार यादीत शोधून संबंधित माहिती बीएलओ यांच्याकडे जमा करावी.

सन २००२ च्या मतदार यादीत नाव शोधण्यासाठी https://voters.eci.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा आपल्या बीएलओ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच जवळच्या राशन दुकानात किवा महा ई-सेवा केंद्रावर आवश्यक फॉर्म उपलब्ध असून मतदारांनी ते भरून बीएलओकडे जमा करावेत. मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवण्यासाठी सर्व मतदारांनी सहकार्य करावे, असे आवाहन श्री. भोसल व तहसिलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (९६ परभणी विधानसभा मतदारसंघ) यांनी केले आहे.

सिंचन विहीर चोरीला गेल्याचा प्रकार;धनगरवाडीत शेतकऱ्यांचे 'विहीर आत्मक्लेश' आंदोलन अन जिल्हा प्रशासनाचा निषेध

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

हिंगोली -हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) मंजूर करण्यात आलेल्या सिंचन विहिरीचे कुठलेही बांधकाम न करता परस्पर अनुदान उचलून त्या अनुदानात गंभीर अपहार झाला असून, चक्क सिंचनहीरच चोरीला गेल्याचा गंभीर प्रकार घडला असून या प्रकरणाने आता उग्र रूप धारण केले आहे. कागदोपत्री विहीर दाखवून शासनाचा निधी लाटल्याच्या आरोपामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी ता १३ रोज शुक्रवारी धनगरवाडी येथे 'विहीर आत्मक्लेश' आंदोलन सुरू केले आहे .

सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी येथील शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी, हिंगोली यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात मनरेगा योजनेअंतर्गत कागदोपत्री सिंचन विहीर दाखवून शासनाच्या निधीचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पीडित शेतकरी रामचंद्र शंकर खडसे यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्या शेतात सिंचन विहीर मंजूर झाल्याचे दाखवून १ लाख ७५ हजार ७२४ रुपयांचा निधी काढण्यात आला. मात्र प्रत्यक्षात शेतात कोणतेही विहिरीचे काम झाले नसून केवळ कागदोपत्री काम दाखवून निधी लाटण्यात आला . या प्रकारामुळे

गरीब शेतकऱ्याच्या हक्काच्या शासकीय योजनेवर डल्ला मारण्यात आल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात संतोष किसन कोरडे हा मुख्य सूत्रधार असून त्यास पंचायत समिती स्तरावरील वरिष्ठ अधिकारी सहभागी असल्याचा असल्याचा आरोप सुद्धा करण्यात येत आहे. तसेच या संदर्भात गोरेगाव पोलीस ठाण्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांना अभय देऊन केवळ दोन जनावर गुन्हा दाखल असतानाही दोन संबंधित आरोपी मोकाट फिरत असून इतर आरोपी मात्र मी त्यातला नव्हेच अशी भूमिका घेत असून त्यांनी सुद्धा या सिंचन विहीर घोटाळ्यात आपले हात ओले करून घेतले असल्याचाआरोप ग्रामस्थांनी होत आहे. आरोपींना तात्काळ अटक झाली नाही तर पुरावे नष्ट होण्याची तसेच सरकारी दस्तऐवज व जिओ-टॅगिंगच्या पुराव्यांमध्ये फ रफार होण्याची शक्यता असल्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. घोटाळ्याची व्याप्ती केवळ एका प्रकरणापुरती मर्यादित नसून संपूर्ण तालुक्यातील अनेक गावात अशा सिंचन विहिरीसह जनावराचा गोठा व पांदण रस्त्यामध्ये प्रचंड अशा आर्थिक रकमेचा घोटाळा झाल्या असल्याचे नाकारता येत नाही त्यामुळे सेनगाव तालुक्यातील महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या विकास कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत एक चौकशी समिती स्थापन करून तालुक्यातील गावोगाव कामाच्या ठिकाणी भेट देऊन कामाची पारदर्शकपणे चौकशी होणे आता गरजेचे झाले आहे कारण संपूर्ण तालुक्यात रोजगार हमी योजना अंतर्गत बोगस कामांचा धडाका तर काही कामे केवळ आणि केवळ कागदोपत्री झाली असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध झाले असून सुद्धा या गंभीर बाबीकडे जिल्हा प्रशासनाने आता लक्ष देणे गरजेचे झाले असून दोषीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी तालुक्यातील जनतेकडून होत आहे. तर अशा प्रकारचे प्रकार घडल्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे या प्रकरणातील मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

६ मार्च रोजी गोरेगाव पोलीसात दाखल गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक करावी, गावातील दलाल संतोष कोरडे यांच्या वर गुन्हा दाखल करावा,पं.स.वरीष्ठ दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना विशेष अधिकारा अंतर्गत जिल्हाधिकारी यांनी सिंचन विहीर योजनेचा लाभ द्यावा या सह विविध मागण्यासाठी संतप्त शेतकऱ्यांनी चक्क १३ मार्च रोजी सकाळीच गावातील विठ्ठल तिडके या शेतकऱ्यांच्या ६०फुट खोल असलेल्या विहीर अंदाजे ५० फुट खोल अंतरावर बाजा वर हे अदोलन सुरु झाले पिडीत शेतकऱ्यांनी चक्क 'विहीर आत्मक्लेश' आंदोलन छेडले, यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी विविध घोषणा बाजी देत भ्रष्ट यंत्रणेला निषेध व्यक्त केला या घटनास्थळी सकाळी दहा वाजेपर्यंत पंचायत समितीचा कर्मचारी हजर नव्हता. गोरेगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या आंदोलनात श्रीराम जगताप, रामचंद्र खडसे, विनोद खडसे, रुस्तुमा होळपादे, बळीराम रवणे, प्रल्हाद गबारे, माधव खडसे, गौरव पाळते या शेतकऱ्यांच्या आपल्या हक्कासाठी शेतकऱ्यांनी छेडलेल्या या आगळ्यावेगळ्या आंदोलनाची परिसरात मोठी चर्चा रंगू लागली आहे.

संबंध शेतकऱ्यावरील अन्याय खपून घेणार नाही:-संदेश देशमुख

सेनगाव तालुक्यात राज्य शासनाकडून शेतकऱ्याच्या विकासात्मक असलेल्या अनेक शासकीय योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अपहार तर काही ठिकाणी केवळ कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले असून यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे जगाचा पोशिंदा माझा शेतकरी राजा अशा शेतकऱ्यावर शासकीय यंत्रणेकडून होणारी फसवणूक व आर्थिक लूट आम्ही कदापी खपवून घेणार नाही असा इशारा शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी दिला आहे.

आज झालेल्या विहीर आत्मकलेश आंदोलनात संदेश देशमुख यांनी स्वतः भाग घेऊन ५० फूट खोलीत विहिरीत उतरून आंदोलनात सहभाग घेतला व भ्रष्ट शासकीय यंत्रणेचा तीव्र शब्दात निषेध करून हंगामी काळात शेतकऱ्याची शासकीय यंत्रणे कडून होणारी फसवणूक व आर्थिक लूट तात्काळ बंद न केल्यास व पंचायत समिती स्तरावरील वरिष्ठ दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्या कठोर कारवाई करण्याची मागणी संदेश देशमुख यांनी केली असून ती तात्काळ न झाल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन उभारणार असल्याचा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी शासकीय यंत्रणेला दिला असल्याने या सिंचन विहीर चोरी प्रकरणात असलेले बडे मासे गळाला लागणार का हे पाहणे आता लक्षणीय ठरणार आहे.

पवार महाविद्यालयात लोकप्रशासन विषयाच्या राष्ट्रीय परिषदेचे व वार्षिक राज्य अधिवेशनाचे आयोजन

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

पुर्णा- येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी लोकप्रशासन विषयाची एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आणि महाराष्ट्र लोकप्रशासन राज्य परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, महाराष्ट्र राज्य लोकप्रशासन परिषद आणि अनुसया शिक्षण प्रसारक मंडळ परभणी व्दारा संचलित स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं.) जिल्हा परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याचे मुख्य संयोजक महाविद्यालयाचे संस्थापक सचिव तथा प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, समन्वयक तथा महाराष्ट्र लोकप्रशासन परिषदेचे सचिव डॉ. संतोष कुऱ्हे यांनी कळविले आहे.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे अधिसभा सदस्य तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर पवार हे असून उदघाटक परभणी महानगरपालिकेचे सदस्य डॉ. केदार खटींग तर प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. पंचशील एकअंबेकर प्राचार्य डॉ.अजय पाटील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ.संतराम मुंढे, प्रा. डॉ. सुरेखा भोसले, लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एम. आय. शेख, व लेखापरीक्षक कुशल गंगवाल आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

'' भारतातील स्वशासन : लोकशाही विकेंद्रीकरण आणि विकासासाठी शाश्वत दृष्टिकोण '' या विषयावरील होणाऱ्या राष्ट्रीय परिषदचे बीजभाषक म्हणून प्रोफेसर डॉ. शाम शिरसाठ हे मार्गदर्शन करणार आहेत .

'' स्थानिक शासन : संविधानीक व संस्थात्मक समस्या आणि उपाय '' या विषयावरील होणाऱ्या चर्चासत्राचे अध्यक्ष प्रा.डॉ. शरण निलंगेकर तर साधन व्यक्ती म्हणून प्रा. डॉ. सुशील कांबळे,प्रा. डॉ. दयाराम मस्के, प्रा. डॉ. चंद्रशेखर गीते हे उपस्थित रहाणार आहेत.

'' लोकशाही विकेंद्रीकरण आणि विकासासाठी शाश्वत दृष्टिकोन '' या विषयावरील होणाऱ्या दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. मीरा फड या असून साधन व्यक्ती प्रा. डॉ. बाबासाहेब मुंडे, प्रा. डॉ.भगवानसिंह बैनाडे, प्रा. डॉ धर्मेंद्र तुरकर हे मान्यवर सहभागी होणार आहेत. या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर पवार तर प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे अधिसभा सदस्य प्रा. डॉ. विजय भोपाळे, प्रा. डॉ. शंकर लेखने, प्रा. डॉ. जितेंद्र वासनिक आदी मान्यवर उपस्थित असणार आहेत.

तरी या राष्ट्रीय परिषदेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा परिषदेचे मुख्य संयोजक डॉ. रामेश्वर पवार, समन्वयक प्रा.डॉ संतोष कुऱ्हे , सहसमन्वयक प्रा.डॉ सुरेश पवार यांनी केले आहे.

जिंतुर- अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिंतूर तालुका वतीने तहसील कार्यालय येथे नायब तहसीलदार प्रशांत राखे यांना १५ मार्च जागतिक ग्राहक दिन घेण्यात यावा निवेदन देताना जिल्हा अध्यक्ष गुलाबराव शिंदे, सचिव सचिन रायपत्रीवार, सदस्य संदीप माहूरकर, संतोष भाऊ दिसत आहेत.

Dharmayoddha.com

जिद्द व परिश्रमाने यश प्राप्त होते- करुणा कुलकर्णी

(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)

सेलू - कठोर परिश्रम, अभ्यासातील सातत्य,नियोजित अभ्यास व योग्य मार्गदर्शन असेल तर यश नक्कीच आपल्याला मिळते असे मत करुणा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात आयोजित स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. बी.डी. एस. (ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप) व एनएमएमएस (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) स्पर्धा परीक्षेत प्राविण्य

मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. करुणा कुलकर्णी पुढे म्हणाल्या की ,तुमच्या यशात आई वडील यांचे योगदानसुद्धा महत्वाचे आहे.नियमित अभ्यास करावा व मार्गदर्शक शिक्षकांकडून प्रश्नाची सोडवणूक करून घ्यावी.जिद्द व कठोर परिश्रम हेच यशाचे गमक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी करुणा कुलकर्णी, प्रमुख पाहुणे म्हणून उपेंद्र बेल्लुरकर उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे,रागिणी जकाते,अनिल कौसडीकर,शंकर राऊत यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.यशस्वी विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे यांनी उत्तम विद्यार्थी व्हा व शाळेचा नावलौकिक वाढवा अशी मनीषा व्यक्त केली. मार्गदर्शक शिक्षकांचा देखील सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन चंदू कव्हळे ,प्रास्ताविक नामदेव एकशिंगे, यादीवाचन चेतन नाईक, आभार स्वप्नाली देवडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

यशवंतराव चव्हाण हे केवळ एक नेते नव्हते तर ते महाराष्ट्राचे संस्कृती आणि विचारांचे प्रतीक होते- प्राचार्य डॉ. एम. एल. धर्मापुरीकर

(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)

परभणी- म. शि. प्र.मं . संचलित श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी येथे गुरुवार, १२ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार यांची ११३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एल. धर्मापुरीकर यांनी प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांना यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय वारसा आणि योगदान आपल्या भाषाशैलीत उलगडून दाखवले त्यात त्यांनी यशवंतराव चव्हाण यांनी केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात मोलाची भूमिका बजावली. संयुक्त महाराष्ट्र चळवळी नंतर राज्याची धुरा सांभाळताना त्यांनी कृषी आणि औद्योगिक विकासाचा पाया घातला. त्यांनी मांडलेली सहकार आणि पंचायत राज ही संकल्पना आजही ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा कला मानली जाते. यशवंतराव हे एक नेते नव्हते तर ते महाराष्ट्राची संस्कृती आणि विचारांचे प्रतीक होते त्यांनी दिलेली विकासाची दृष्टी आजही आपल्याला मार्गदर्शक ठरत आहे असे तसेच ते उत्तम साहित्यिक आणि उत्कृष्ट राजकारणी होते असे सांगितले. सदरील जयंतीचे आयोजन हे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत विभाग प्रमुख प्रा.डॉ. राजेश बी. देशमुख यांच्या सहकार्याने करण्यात आलेले होते. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती. प्रसंगी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. प्रकाश दादा सोळंके, सचिव मा. आ. सतीश भाऊ चव्हाण तसेच महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य चंद्रशेखर नखाते, गोविंद कदम, मकदुम मोहिउद्दिन, संतोष बोबडे, ॲड. दिपक देशमुख, मा. ॲड. अशोक शिंदे व संतोष इंगळे आदींनी जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

चारठाणा येथे इफ्तार पार्टीत सामाजिक एकात्मतेचे दर्शन

(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

चारठाणा - हिंदू-मुस्लीम बांधवांमध्ये जातीय सलोखा राहावा यासाठी दरवर्षी प्रमाणे या वर्षीही चारठाणा येथील दर्गा मज्जिद येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टी साठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.आमदार विजय भांबळे साहेब , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिंतूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण बुधवंत, जि.प.सदस्य शंकर जाधव,अविनाश मस्के, जिंतुर येथील नगरसेवक जाबेर मुल्ला,दलमिर खॉ पठाण, सरपंच राजेश चव्हाण हे होते. तर या इफ्तार पार्टी साठी मुबारक हफिज सहाब, सचिन राऊत, कैलास महाराज देशमुख, दशरथ चव्हाण, मा.सरपंच बि,जी चव्हाण ,प्रभाकर देशमूख, मधुकर भवाळे, सय्यद खयसरभाई, कासीमभाई इनामदार, राजु काजी, संदीप खके, बाळासाहेब घाटुळ, भुजंग सोनवणे, जिनाखा पठान, गेंदेखा पठाण, गुलाब निकाळजे, बाबा भाई, मौला कुरेशी, मुजमिक कुरेशी, नासर शेख, अशोक निकाळजे, स.तालेब आली, यांच्यासह मुस्लिम बांधव उपस्थित होते. या इफ्तार पार्टीसाठी सलीम काझी,जलील इनामदार, सय्यद इम्रान,माजेद देशमुख, नानासाहेब निकाळजे,जरावर पठाण यांच्यासह चारठाणा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

महिला दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव न राहता, तो समाजाच्या मानसिकतेत बदल घडवण्याचा एक निरंतर प्रवास बनला पाहिजे- प्रा. अहिल्या अंजनडोहकर; श्री शिवाजी विधी महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा

(सिध्देश्वर गिरी/दै.धर्मयोध्दा)

परभणी- म. शि. प्र. मं. संचलित श्री शिवाजी विधी महाविद्यालयात महिला दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात कर्तव्य पार पाडणाऱ्या महिलांचा शाल व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एल. धर्मापुरीकर हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महिला बजावत असलेली दुहेरी भूमिका (उंबरठ्याच्या आतील आणि बाहेरील) यावर भाष्य करत पुढे त्यांचा आदर आणि सन्मान हा प्रत्येक पायरीवर कसा राखल्या जाईल याविषयी भाष्य

केले. तर उपस्थित सन्मानित करण्यात आलेल्या कर्तव्यदक्ष महिला कर्मचाऱ्यातील प्रातिनधिक स्वरूपात प्रा.अहिल्या अंजनडोहकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले मनोगताच्या सुरुवातीला त्यांनी महाविद्यालयाने स्त्रियांच्या सन्मानार्थ घेतलेल्या कार्यक्रमाविषयी प्राचार्यांचे धन्यवाद व्यक्त केले तसेच स्त्रियांकडे बघण्याचे दृष्टिकोन आता बदलत आहेत आणि त्यामुळे त्यांचे जगण्याचे संदर्भ देखील बदलतील, स्त्रियांची संघर्षाची वाटचाल फार मोठी आहे त्यामुळे त्यांना आजची समकालीन समाजात स्वतः ला प्रत्येक वेळी सिद्ध करावं लागतं, महिला प्रति सन्मान व्यक्त न करता त्यांना समानता देणे गरजेचे आहे समानतेतून त्यांना सन्मान आपोआप मिळेल. पितृसत्ताक व्यवस्थेत तर्काधीष्टीत चष्म्यातून स्त्रियांकडे एक माणूस म्हणून पाहता यायला हवं. स्त्रियांच्या स्थितीस केवळ पुरुषप्रधानता जबाबदार नसून स्त्री स्वतः सुद्धा जबाबदार आहे, स्त्रियांनी आपलं परावलंबित्व आता कमी करायला हव जेणेकरून ''एका आरोग्यदायी विकसित समाजाकडे वाटचाल करता येईल'' कारण Gender is Socially Constructed आहे असे नमूद करून त्यांनी आपल्या मनोगताचा शेवट '' Yes we are Feminist but we don't hate men ' '' या विधानाने केला. सदरील सोहळ्याचे आयोजन हे प्रा. डॉ. अनिता आर. देशमुख यांच्या सहकार्यातून करण्यात आलेले होते. या सोहळ्यास महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. प्रसंगी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री प्रकाश दादा सोळंके, सचिव मा. आ. श्री सतीश भाऊ चव्हाण तसेच महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य मा. श्री चंद्रशेखर नखाते, मा. श्री. गोविंद कदम, मा. मकदुम मोहिउद्दिन, मा. श्री. संतोष बोबडे, मा. ॲड. दिपक देशमुख, मा. ॲड. अशोक शिंदे व मा. श्री. संतोष इंगळे आदींनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao